# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

सातारा तालुका पोलीस ठाणे

संपर्क- 02162-238607

ईमेल- sataratps.satara@mahapolice.gov.in


दिनांक :- 30/01/2025

## प्रेसनोट

**-: सातारा तालुका पोलीसांची जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुक अनुशंगाने एकुण 3 लाख 89 हजार 200 रुपये चा मुददेमाल हस्तगत:-**

**( सातारा तालुका गोपनिय अंमलदार याची कामगिरी )**

मा.श्री.तुषार दोशी पोलीस अधिक्षक सो सातारा ,मा श्रीमती वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, मा. श्री राजीव नवले उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक अनुशंगाने अवैध्द धंदयावर कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

त्याप्रमाणे दि.29/01/2026 रोजी पोलीस निरीक्षक श्री निलेश तांबे व गोपनिय अंमलदार पोलीस हवालदार धनंजय कुंभार असे स्टाफ सह पोलीस ठाणे हदीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक अनुशंगाने पेट्रोलिग करीत असताना मौजे दरेखुर्द गावचे हदीत महादरे जाणारे रोडचे कडेस मारुती स्विफ्ट कार क्रमांक MH 14 GD 0165 ही दिसली. गाडीतील इसमांकडे चौकशी केली असता गाडीतील इसमांने विचारलेल्या प्रश्नांची उडवाउडवीची उत्तरे दिल्याने तसेच सदर गाडीची तपासणी करणेस आडकाठी केल्याने सदर गाडीची दोन पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये देशी व विदेशी दारु एकुण 9 बॉक्स कि.अंदाजे 39,200 रु.व अंदाजे 3 लाख 50 हजार रु किंमतीचे चारचाकी वाहन असा एकुण 4 लाख 89 हजार 200 रुपये चा मुददेमाल हस्तगत करणेत आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोलीस हवालदार मालोजी चव्हाण हे करित आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक सो, सातारा, तुषार दोशी, मा.अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा श्री राजीव नवले, सातारा तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली गोपनिय अंमलदार पोहवा धनंजय कुंभार ,पोहवा महेद्र नारनवर ,पोहवा मालोजी चव्हाण पो.कॉ.सुनिल भोसले ,पो.कॉ.धिरज पारडे यांनी केलेली आहे.

सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे **श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्री राजीव नवले, मा.उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा** यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

**पोलीस अधीक्षक सातारा यांच्या मान्यतेने**

**प्रति,**

**सर्व वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा**

**सर्व मिडीया प्रतिनिधी सातारा**